# जनसंपर्क विभाग

जनसंपर्क खात्यामार्फत विविध नागरी सेवा - सुविधा, प्रकल्प आणि महत्त्वाच्या नागरी घटना – घडामोडी व समारंभांची माहिती प्रसृत केली जाते. तसेच महा**नगर**पालिकेतील विविध प्रकारच्या नागरी कार्यक्रमांचे व समारंभांचे आयोजन आणि त्याबाबतची माहिती या खात्याकडून त्या – त्या खात्याला / विभागाला करण्यात येऊन, समारंभप्रसंगी पाळावयाच्या राजशिष्टाचारांबाबतही मार्गदर्शन केले जाते. या खात्याकडून सार्वजनिक आरोग्य, सामुदायिक रोगप्रतिबंधक लसटोचणी, स्वच्छता, शिक्षण व इतर नागरी विषयांसंदर्भात मोहिमा आयोजित केल्या जातात. स्वच्छता, पाणी टंचाई, बृहन्मुंबईमधील झोपडपटट्यांमध्ये व इतर सखल भागांमध्ये पाणी भरणे, पावसाळ्यात पूर येणे, धोकादायक इमारती कोसळणे तसेच दरडी कोसळणे या संभाव्य दुर्घटनांबाबत स्थानिक नागरिकांना आवाहन करणे, विविध प्रकारच्या नागरी तक्रारी, प्रश्नांबाबत निराकरण करण्याची कार्यवाही करणे नि विविध नागरी सेवा-सुविधाबाबंत प्रसार व प्रचार करण्याचे काम या विभागाकडून नियमितपणे केले जाते.

**प्रकाशने:**

जनसंपर्क विभागामार्फत लोकांच्या माहितीसाठी नागरी मार्गदर्शिका, नागरी दैनंदिनी, आपल्या विभागाची माहिती, महापालिका नगरसेवक / नगरसेविका व अधिकारी यांच्या नावांची यादी, बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रिका, दिनदर्शिका, महत्त्वाच्या नागरी घटना व इतर नागरी बाबींसंबंधात प्रकाशने, सचित्र भित्तीपत्रके, घडीपत्रे व माहिती पुस्तिका इत्यादी प्रकाशने आणि प्रसिद्धी साहित्य निर्माण केले जाते. ही प्रकाशने खात्यात विक्रीसाठी ठेवली जातात. ह्याव्यतिरिक्त इतर काही विभागांची प्रकाशनेसुद्धा विक्रीसाठी उपलब्ध असतात. प्रतिवर्षी दिनांक ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिका, तसेच श्री गणेशोत्सवामध्ये माहिती पुस्तिका प्रकाशित करण्यात येते.

**स्पर्धा:**

प्रतिवर्षी जनसंपर्क विभागाकडून बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये 'श्री गणेश गौरव स्पर्धा' आयोजित करण्यात येते. स्पर्धक मंडळांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, प्रबोधनपर व महानगरपालिकेशी संलग्न असणा-या सेवा-सुविधांची माहिती दर्शविणा-या देखाव्यांचे परीक्षक मंडळांकडून परीक्षण करण्यात येते व पारितोषिके विशेष समारंभपूर्वक दिली जातात.

**बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रिका:**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुखपत्र म्हणून 'बृहन्मुंबई महानगरपालिका पत्रिका' हे मासिक प्रकाशित करुन ते वितरित करण्याची जबाबदारी याच विभागाकडून पार पाडली जाते. या मासिकात महानगरपालिका नगरसेवक / नगरसेविका, अधिकारी आणि कर्मचारी यांचे माहितीपूर्ण आणि संशोधनपर तपशिल देणारे तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देणारे लेख प्रसिद्ध केले जातात. दिनांक ०१ मे, २०१३ पासून नव्या स्वरुपात नि नव्या ढंगात हे ‘मुखपत्र’ पुनश्च सुरु करण्यात आले.

**वार्तापत्रे आणि छायाचित्रे:**

महापालिकेने दिलेल्या विविध नागरी सेवा – सुविधा, प्रकल्पांची माहिती, महापालिकेच्या विविध उपक्रमांबाबत प्रसिद्धीपत्रके तसेच पालिकेच्या विविध खात्यांकडून व विविध खाते प्रमुख यांनी प्रसिद्धीसाठी पाठविलेली वार्तापत्रे / प्रसिद्धीपत्रके, महानगरपालिकेचे प्रमुख पदाधिकारी आणि अधिकारी यांच्या विविध कार्यक्रमांची वार्तापत्रे, वृत्तपत्रे नि प्रसारमाध्यमांना प्रसारित करण्याची महत्त्वपूर्ण दैनंदिन कार्ये जनसंपर्क विभागाकडून करण्यात येतात. महानगरपालिकेतील प्रत्येक महत्त्वाच्या घटना – घडामोडींचे व समारंभांचे छायाचित्रण या खात्यामार्फत करण्यात येते. नागरी समारंभ, नागरी सेवा, उपक्रम, प्रकल्पांबाबतची विविध छायाचित्रे, वार्तापत्रे / प्रसिद्धीपत्रकांसमवेत सर्व प्रसिद्धी माध्यमांना प्रसिद्धीसाठी पाठविली जातात.

**जाहिराती:**

महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या जाहिराती तसेच नागरिकांसाठी माहितीपूर्ण प्रबोधनात्मक जाहिराती प्रसिद्ध करण्याच्या कामाबरोबर जाहिरातीसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याचे त्याबरोबरच प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे आणि जाहिरात संस्थांशी संपर्क विकसित करण्याचे कार्यही जनसंपर्क खात्याकडून केले जाते. महापालिकेतील विविध खात्यांकडून प्रसिद्धीस येणा-या जाहिरातींचे कार्य सुकर आणि कार्यक्षम बनविण्याचे काम जनसंपर्क विभागाने केले आहे.

**प्रदर्शने:**

बृहन्मुंबईच्या पाणीपुरवठ्याविषयीचे एक कायमस्वरुपी रंगीत पारदर्शिकांचे प्रदर्शन या विभागामार्फत मोडकसागर (वैतरणा) येथे प्रदर्शित करण्यात आले आहे.

या खात्याद्वारे अनेकदा नागरी विषयांवरील प्रदर्शने आणि नागरी बाबींसंदर्भात प्रसिद्धीचे कार्य आयोजित केले जाते. माऊंट मेरी जत्रेमधील आरोग्याविषयीचे प्रदर्शन, श्री गणेश विसर्जनदिनी गिरगांव चौपाटी येथे नागरी सेवा - सुविधाविषयक प्रदर्शन तसेच उद्यान खात्यामार्फत दरवर्षी आयोजित केले जाणारे फळे, फुले व भाज्यांचे प्रदर्शन इत्यादी नियमित प्रदर्शनांबाबतीत या खात्याकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येते. मुंबईत तसेच देशातील विविध शहरांत भरणा-या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात महापालिका सहभागी होऊन नागरी सेवा-सुविधांविषयक सचित्र माहिती देणारी दालने उभारली जातात.

**वृत्तपत्रीय खुलासे:**

महापालिका वार्तापत्रांच्या प्रसिद्धीव्यतिरिक्त महापालिकेच्या दैनंदिन कामकाजांबाबत आणि नागरी सेवा – सुविधांबाबत प्रसिद्ध होणा-या टिका - टिप्पणीस उचित उत्तरे वा खुलासे तयार करुन प्रसिद्धीसाठी त्या – त्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीसाठी पाठविण्यात येतात नि त्यास चांगल्या प्रकारे प्रसिद्धी देण्यात येते. विपरित वृतांमुळे जनमानसात डागाळलेली महापालिकेची प्रतिमा वस्तुस्थितीदर्शक खुलाश्यांद्वारे उजळण्यासाठी नि प्रतिमा अधिकाधिक उंचावण्याचे काम या विभागाकडून करण्यात येते.

**नागरिकांची गाऱ्हाणी:**

नागरी सेवा - सुविधांची माहिती देतानाच अभ्यागत नागरिकांना त्यांची लेखी अथवा प्रत्यक्ष भेटीत केलेली गाऱ्हाणी दूर करण्यासाठी त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाते.

**वीजकीय व सामाजिक माध्यमे:**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रसिद्धी माध्यमांप्रमाणेच सामाजिक माध्यमे अर्थात 'सोशल मीडिया' देखील जनसंपर्काचे प्रभावी आणि तत्पर साधन बनू पाहत आहे. हे लक्षात घेऊन या साधनाचाही अवलंब करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या खात्याने 'फेसबुक' या जगातील अग्रगण्य सामाजिक माध्यमाचा **BMC, Mumbai : Public Interaction Forum** या नावाने वापर सुरु केला आहे.

पारंपरिक मुद्रित माध्यमांसोबत वीजकीय माध्यमे आणि नभोवाहिन्या यांच्या माध्यमातून देखील दैनंदिन प्रसिद्धी कार्ये, प्रचार व प्रसार मोहिमा, जाहिराती प्रसारणावर या खात्याने लक्ष केंद्रीत केले असून यामुळे वेगवान जनसंपर्क शक्य होतो आहे.

**कात्रणसंग्रह:**

महापालिकेच्या कामकाजाबाबत दैनंदिन वृत्तपत्रांमधून आणि प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध होणाऱ्या मतप्रणाली आणि टिका – टिप्पण्यांची दखल घेऊन त्यांच्या कात्रणसंग्रह नस्ती संकलित करणे तसेच पुढील कार्यवाहीस्तव मा. महापौर, मा. महापालिका आयुक्त, सर्व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त, विविध विभाग प्रमुखांना त्यांच्या माहितीकरिता नि योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविणे, याबाबतीत प्रशासनास त्याबाबत अवगत करण्याची महत्वपूर्ण नि वेळेत पूर्ण करावयाची कार्यवाही या कार्यालयामार्फत नियमितपणे करण्यात येते. कागदाचा कमीत-कमी वापर व्हावा आणि जलदरित्या कात्रणे पाठविता यावीत, याकरीता कात्रण नस्ती 'स्कॅन' करुन ई-मेलद्वारे पाठविण्यात येतात.

**मराठी भाषा पंधरवडा:**

महापालिकेच्यावतीने सन २०१० पासून नियमितपणे 'मराठी भाषा पंधरवडा' आयोजित करण्यात येत आहे. कविश्रेष्ठ वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती दिनांक २७ फेब्रुवारीपासून आयोजित करण्यात येणाऱ्या या पंधरवड्यासाठी मराठी भाषेची गौरवपर घोषवाक्ये, कविता आदींचा समावेश असणारी माहितीपूर्ण आणि कलात्मक भित्तीपत्रके तयार नि प्रकाशित करुन त्यांचे महापालिका विभागांमध्ये वितरण, मराठी भाषा पंधरवडा शुभारंभ कार्यक्रमाचे परिपूर्ण आयोजन, त्याकरिता ज्येष्ठ / नामांकित मराठी साहित्यिकांना प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करणे, ही कार्ये मराठी भाषा विभाग आणि शिक्षण खाते यांच्याशी समन्वयाने जनसंपर्क विभागाच्यावतीने करण्यात येतात.

***